जळगाव, दि. ८ जुलै : दिव्य मराठीच्या एक वृक्ष एक अभियानांतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळेतर्फे मंगळवार दिनांक ७ जुलै रोजी विद्यापीठ परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. विविध प्रकारच्या पर्यावरणपूरक व दीर्घायुषी वृक्षांसह फुलझाडांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करण्यात आला. कार्यक्रमास विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील, रसायनशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. दीपक दलाल, प्रा. डॉ. व्ही. व्ही. गीते, डॉ. ए. एम. पाटील, डॉ. ए. डी. जंगले, डॉ. एस. पी. गाडेकर, डॉ. पी. बी. राठोड, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी, डॉ. निवृत्ती पाटील, अमृत दाभाडे, किशोर पाटील, डॉ. वीणा उद्धगे, मनोज भालेराव, स्वप्नील सुरवाडे, सुदाम पाटील, अरुण सपकाळे तसेच विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते निम, वड, पिंपळ, औदुंबर, साग, पडस यांसह विविध फुलझाडांची लागवड करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना सीए रवींद्र पाटील यांनी वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि तापमानवाढ या जागतिक समस्यांवर प्रभावी उपाय म्हणून वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन अत्यावश्यक असल्याचे सांगितले. प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रा. दीपक दलाल यांनी सांगितले की, वृक्ष हे केवळ प्राणवायूचे स्रोत नसून मृदसंवर्धन, पर्जन्यमानाचे संतुलन, भूजल पुनर्भरण आणि पक्षी तसेच वन्यजीवांसाठी नैसर्गिक अधिवास निर्माण करणारे महत्त्वाचे घटक असल्याचे सांगितले.

पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षारोपणाबरोबरच प्लास्टिकचा वापर कमी करणे, पाण्याची बचत करणे आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

या अभियानासाठी वन्यजीव संरक्षण बहुउद्देशीय संस्थेने वृक्ष उपलब्ध करून सहकार्य केले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बालकृष्ण देवरे यांच्यासह प्रदीप शेळके, राजेश सोनवणे, गणेश सपकाळे, अजीमोद्दिन काझी, हेमराज सपकाळे, जगदीश महाराज आणि योगेश गालफाडे उपस्थित होते. वृक्षारोपणामुळे परिसराचे सौंदर्य वाढण्याबरोबरच हवेची शुद्धता, भूजल संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यास मोठी मदत होते, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळेचा हा उपक्रम हरित, स्वच्छ आणि शाश्वत पर्यावरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरत असून पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती निर्माण करणारा ठरणार आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ०८ जुलै, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता